तत्काळ **महाराष्ट्र शासन**

क्र.प्रतिनि-२०१७/प्र.क्र.१३३/का-१४
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ८.११.२०१७

प्रति,

सह सचिव/उप सचिव, (आस्था)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय- प्रतिनियुक्तीने पदे भरण्याबाबत.

संदर्भ- १.सम क्रमांकित दि.२५.९.२०१७ चे पत्र व दि.३१.१०.२०१७ चे स्मरणपत्र.
२. शासन पत्र क्र.प्रतनि-२०१७/प्र.क्र.१३६/का-१४, दि.११.१०.२०१७
३. सम क्रमांकित दि.६.११.२०१७ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१, २ व ३ येथील पत्रांतील नमूद विवरणपत्र अ, ब व क येथील नमूद पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत मंत्रालयीन विभागातील सह/उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आल्या होत्या. सदर प्रतिनियुक्तीच्या पदांमध्ये बदल करून आता नव्याने पुढील प्रमाणे इच्छुकता मागविण्यात येत आहेत.

२. आता मंत्रालयीन सह/उप सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून खालील विवरणपत्र-अ येथे नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

विवरण-अ (सह/उप सचिव संवर्गाकरीता)

अ.क्र.	प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ
१	प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नागपूर
२	प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती
३	कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
४	सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
५	उप सचिव, राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठ
६	उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ
७	उप सचिव, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ
८	उप सचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
९	मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्त विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
१०	महाव्यवस्थापक (क.व औ.सं.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
११	संचालक, पर्यटन संचालनालय
१२	व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ

३. आता मंत्रालयीन अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून खालील विवरणपत्र-ब येथे नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

विवरण-ब (अवर सचिव संवर्गाकरीता)

अ.क्र.	प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ
१	मुख्य प्रशासकीय अधिकारी, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव
२	अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
३	अवर सचिव, प्रवेश नियामक व शुल्क नियामक प्राधिकरण बांद्रा, मुंबई
४	उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
५	उप संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
६	प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य व बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई
७	सहायक संचालक, विमान चालन संचालनालय

४. आता मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांमधून खालील विवरणपत्र-क येथे नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

विवरण-क (कक्ष अधिकारी संवर्गाकरीता)

अ.क्र.	प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदनाम व स्थळ
१	सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा, नवी मुंबई
२	कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय
३	कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ, नाशिक
४	कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर
५	कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, मुंबई
६	उप कार्यकारी अधिकारी, सिध्दीविनायक गणपती मंदिर, मुंबई
७	कक्ष अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई (२ पदे)

५. मंत्रालयीन विभागातील सह/ उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांमधून उपरोक्त विवरणपत्र अ,ब व क येथील नमूद प्रतिनियुक्तीची पदे भरण्याबाबतचा कालावधी दि.१८.११.२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तरी, आपल्या विभागातील प्रतिनियुक्तीसाठी इच्छुक अधिकाऱ्यांची माहिती दि.१८.११.२०१७ पर्यंत पाठवावी. तसेच इच्छुक अधिकाऱ्यांनी आपल्या संबंधित विभागाकडे केलेल्या अर्जाची एक आगाऊ प्रत सा.प्र.वि.(का-१४, १४-अ व १४-ब) यांना परस्पर सादर करावी.

६. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११०८१२५२२७६१०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.11.08 12:40:53 +05'30'

आपला विश्वासू,

(ग.भि.गुरव)